गुरुवार, दि. १४ ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १ ला ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जविघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

आगामी महानगर पालिका निवडणुक

# अंतर्गत कलह महायुतीची डोकेदुखी वाढवणार? महाविकास आघाडीकडून सक्षम उमेदवाराचा शोध

**दीपक शेळके**

**जालना** - जालना शहराची नगरपालिका आता महानगरपालिकेत रूपांतरित झाल्यामुळे आगामी निवडणुका अत्यंत महत्त्वाच्या ठरणार आहेत. काँग्रेसचे जुने आणि प्रभावशाली नेते माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी नुकताच भाजपमध्ये प्रवेश केल्याने जालन्यातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत. एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या जालना मनपावर आता वर्चस्व मिळवण्यासाठी भाजप-महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात मोठी चुरस पाहायला मिळणार आहे.

राज्यात भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांची महायुती आहे. जालना शहरात ही युती म्हणून लढल्यास, त्यांच्याकडे मोठा जनाधार एकत्रित होण्याची शक्यता आहे. कैलास गोरंट्याल यांच्या भाजप प्रवेशामुळे, काँग्रेसचा पारंपरिक मतदारवर्ग भाजपच्या बाजूने वळू शकतो, ज्यामुळे महायुतीचे ४५ ते ५० नगरसेवक निवडून येण्याचा अंदाज राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

मात्र, या संभाव्य विजयाच्या मार्गात मोठा अडथळा म्हणजे माजी आमदार कैलास गोरंट्याल आणि शिवसेनेचे (शिंदे गट) नेते आमदार अर्जुनराव खोतकर यांच्यातील टोकाचे मतभेद. या दोन नेत्यांमधील राजकीय वैमनस्य सर्वश्रुत आहे. जर आगामी निवडणुकीत हे मतभेद बाजूला सारून दोन्ही गट एकत्र आले नाहीत, तर त्याचा थेट फटका महायुतीला बसू शकतो. दोन्ही नेत्यांचे समर्थक एकमेकांविरुद्ध लढल्यास मतांचे विभाजन होऊन त्याचा फायदा थेट प्रतिस्पर्धकांना होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, महायुतीच्या नेतृत्वाला या दोन नेत्यांमध्ये समेट घडवून आणण्याचे मोठे आव्हान पेलावे लागणार आहे.

दुसरीकडे, काँग्रेस पक्ष सध्या जालना शहरात दुबळ्या अवस्थेत आहे. कैलास गोरंट्याल यांच्यासारखा अनुभवी चेहरा भाजपमध्ये गेल्याने काँग्रेसला नेतृत्वाची मोठी पोकळी जाणवत




आहे. मात्र, शहरात काँग्रेसचा पारंपरिक मतदार आजही मोठ्या प्रमाणात आहे. महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस, शिवसेना (उद्धव ठाकरे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), मनसे, आप आणि इतर पक्ष आहेत. सध्या अस्तित्वासाठी संघर्ष करत असलेल्या शिवसेना (उद्धव ठाकरे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) यांनी काँग्रेससोबत एकत्र येऊन रणनीती आखल्यास मनपा निवडणुकीत त्यांची ताकद वाढू शकते.

या परिस्थितीत काँग्रेसला एका सक्षम चेहऱ्याची गरज आहे. स्वबळाचा नारा दिल्यास काँग्रेसला हि निवडणुक जड जाणार हे निश्चित आहे. काँग्रेससह महाविकास आघाडीकडून सक्षम उमेदवाराचा सध्या शोध सुरु आहे. जर महाविकास आघाडीने एकत्र येऊन शिवसेना (उद्धव ठाकरे) गटाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष भास्कर अंबेकर यांना महापौरपदासाठी पुढे केले, तर त्याचा फायदा त्यांना होऊ शकतो. अंबेकर यांचा चेहरा काँग्रेसच्या मतदारांना आकर्षित करू शकतो. जनतेतून निवडणून येणार पहिले नगराध्यक्ष ते आहेत. त्यांच्या उमेदवारीमुळे महाविकास आघाडीला एकजुटीने लढण्याची संधी मिळेल.

महापालिका निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यासाठी दोन्ही बाजूंनी अनेक दावेदार आहेत. भाजपमध्ये माजी आमदार कैलास गोरंट्याल, त्यांची पत्नी आणि माजी नगराध्यक्षा संगीताताई गोरंट्याल आणि भाजप जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे हे प्रमुख दावेदार मानले जात आहेत. शिवसेनेच्या (शिंदे गट) वतीने विष्णू पाचफुळे यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. या स्पर्धेत इतर लहान पक्ष आणि अपक्ष नगरसेवक पदासाठीच्या उमेदवारांची भूमिका काही निर्णायक ठरू शकते. जालना शहर महानगर पालिकेच्या निवडणुकीसाठीच प्रभाग रचना, प्रभाग निहाय निवडणुका झाल्यास एका प्रभागात तीन-चार कि पाच नगरसेवक राहणार यावरही बरेचसे




समिकरणे अवलंबून राहणार आहे.

जालना मनपा निवडणुकीतील विजयाचा मार्ग हा एकसंधपणा आणि अंतर्गत संघर्ष व्यवस्थापनावर अवलंबून आहे. महायुतीला गोरंट्याल आणि खोतकर यांच्यातील मतभेद मिटवून एकजुटीने लढावे लागेल, तरच त्यांना मोठे जालना मनपावर आपला झेंडा फडकवेल, हे निश्चित आहे.

---

# अखेर मिरची वाहतूक करणारा ट्रक पलटी

गावकऱ्यांची भीती ठरली खरी; आता तरी प्रशासन लक्ष देईल का?

**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी** - जाफराबाद येथील मिरची मार्केटमधून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकमुळे टेंभुर्णीकरांमध्ये असलेली भीती अखेर खरी ठरली आहे. वृत्तपत्रांनी वारंवार इशारा देऊनही प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याने, बुधवारी रात्री टेंभुर्णी येथील मुख्य रस्त्यावर मिरची वाहतूक करणारा एक ट्रक पलटी झाला. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र ट्रक चालक जखमी झाला असून, ट्रकचे मोठे नुकसान झाले आहे.

हा अपघात रात्री दहा वाजण्याच्या सुमारास घडला. पश्चिम बंगाल येथे मिरची घेऊन जाणारा (क्र. WB २५ B ७९४२) हा ट्रक भरधाव वेगाने येत असताना त्याचे नियंत्रण सुटले आणि तो पलटी झाला. या अपघातात चालकाचा हात फ्रॅक्चर झाल्याचे समोर आले आहे.

जाफराबाद मिरची मार्केटमधून विविध राज्यांमध्ये मिरचीची वाहतूक होते. वेळेवर पोहोचल्यास व्यापाऱ्यांकडून अतिरिक्त बक्षीस मिळत असल्याने ट्रक चालक धोकादायक वेगाने वाहने चालवतात. यामुळे टेंभुर्णी शहरातून जाणाऱ्या रस्त्यावर अपघाताची शक्यता वाढली होती, ज्याची भीती स्थानिक नागरिक व्यक्त करत होते.



स्थानिक व्यापारी आणि नागरिकांनी या घटनेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. व्यापारी ज्ञानेश्वर फिरके यांनी सांगितले की, मिरची ट्रक चालकांकडून भरधाव वेगाने वाहने चालवली जातात. त्यामुळे टेंभुर्णी शहराच्या रस्त्यावर तातडीने गतिरोधक बसवणे आवश्यक आहे. त्यांनी पुढे म्हटले की, आमची दुकाने मुख्य रस्त्यावर असून, सायंकाळी पाच वाजेपासून ट्रकची वाहतूक सुरू होते. यामुळे आम्हाला जीव मुठीत धरून रस्त्यावर चालावे लागते.

व्यापारी महासंघाचे अध्यक्ष अलकेश सोमाणी यांनीही चिंता व्यक्त केली आहे. ते म्हणाले, या वाहतुकीमुळे आम्ही सगळे भयभीत झालो आहोत. जीव मुठीत घेऊन फिरावे लागत आहे. पोलिस प्रशासनाने यावर


युवा आदर्श
epaper.yuvaadarsh.com
07 Aug 2025 - Page 1 - Editor ~ Deepak Shelke contact Whatsup 8390098886

## मिरची वाहतूक ट्रकची अतिवेगाने धाव; अपघाताचा धोका वाढतोय!

स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांची पोलिसांकडे वेग मर्यादा कमी करण्याची मागणी

**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद** - तालुक्यात सध्या मिरची मार्केट भरात असून, शेकडो गावांतून मोठ्या प्रमाणात मिरचीची आवक सुरू आहे. या भागातील मिरची थेट मुंबईजवळील वाशी मार्केट तसेच देशभरातील मोठ्या शहरांमध्ये पाठवली जाते. मिरची वेळेत पोहोचली तर जास्त भाव मिळतो, आणि त्यामुळे वाहनचालक मोठ्या वेगाने ट्रक चालवत असल्याचे चित्र दिसून येत आहे. वाहनचालक वेळ वाचवण्यासाठी आणि जास्त नफा मिळवण्यासाठी ट्रक अतिशय वेगाने चालवत आहेत. यामुळे सामान्य वाहनधारक आणि पादचाऱ्यांचे प्राण धोक्यात, रस्त्यालगतच्या व्यवसायिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीच्या वेळी विशेषतः हॉर्न आणि स्पीडचा त्रास सहन कराव लागत आहे. सदोष ड्रायव्हिंगमुळे अपघात होण्याची शक्यता प्रचंड प्रमाणात वाढली आहे.

सध्या जाफ्राबादहून बाहेर जाणारे मिरची ट्रक अतिशय वेगाने जातात. पोलीस प्रशासनाने वेळीच लक्ष घालून कठोर उपाययोजना कराव्यात. नाहीतर मोठ्या प्रमाणात अपघात होऊ शकतात. अशी प्रतिक्रिया ॲड. किशोर गायकवाड यांनी युवा आदर्शच्या प्रतिनिधीशी बोलतांना दिली.

माझं गाडी सर्व्हिसिंगचं दुकान या मार्गावर आहे. संध्याकाळी ट्रक एकमेकांशी जणू स्पर्धाच करतात. हॉर्न वाजवत, प्रचंड वेगात धावत असल्यामुळे आमच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचे व्यापारी लक्ष्मण शिंदे यांनी म्हटले आहे. परिसरातील व्यापारी व नागरिकांकडून स्पीड लिमिट लागू करावी, प्रत्येक ट्रकवर GPS किंवा स्पीड मॉनिटरिंग यंत्रणा बसवावी, पोलिसांनी नियमित नाकाबंदी आणि तपासणी मोहीम राबवावी, दंडात्मक कारवाई सुरू करावी अशा मागण्या केल्या आहेत.

ही समस्या सोडवण्यात उशीर झाल्यास, भविष्यातील अपघात होण्याची शक्यता आहे त्यामुळे याकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देणे अत्यावश्यक आहे.

जाफ्राबाद परिसरात शेतकऱ्यांच्या मिरचीच्या उत्पन्नाला योग्य बाजार मिळावा हे जितकं गरजेचं, तितकंच रस्त्यावरील नागरिकांचा जीव सुरक्षित राहणे आवश्यक आहे. त्यामुळे स्थानिक पोलीस व वाहतूक विभागाने तत्काळ लक्ष घालून योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.



**मिरची वाहतूक ट्रकची अतिवेगाने धाव संदर्भाने मागील आठवड्यात प्रकाशित झालेले वृत्त...**

काहीतरी करणे गरजेचे आहे, अन्यथा मोठा अपघात होण्याची शक्यता वाढली आहे.

या अपघातानंतर संबंधित मिरची दुसऱ्या ट्रकमध्ये भरून मुंबईकडे रवाना करण्यात आली. मात्र, या घटनेमुळे टेंभुर्णीकरांनी केलेल्या मागण्यांकडे प्रशासन कधी लक्ष देणार, हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

---

युवा आदर्श

## कागदी झेंडा ...

कागदी झेंडा छोटा
कोटा लावला छान
बदलले माझे रुपडे
ताठ आपसूक मान
भरून आलायं ऊर
हरपून चालले भान
गायला लागले ओठ
जन गण मन गान
स्फुल्लिंग ते जाळले
संतृप्त जाहले कान
फुलून आली छाती
तिरंगा अपनी जान
तिरंग्या पुढे खुजे हे
वाटू लागले जहान
आगळी तया कथा
भविष्य तया महान
दुसरे काही ना प्रिय
आता तिरंग्या समान
शत कोटींचे वाढला
देशाभिमान सन्मान
माझी माती माझा देश
संदेश अत्युच्च महान
आत्मीय वसुधा वंदन
जरी गोष्ट वाटे लहान
हृदया मिळे समाधान
जाणूनघेता संविधान
एका प्रसंगे सावधान
जाणवे मज अवधान

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

---

# मराठवाडा शिक्षक संघाचे आमरण उपोषण

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी** - मराठवाडा शिक्षक संघाचे, कै. नानासाहेब पाटील विद्यालय, नजीक पांगरी तालुका बदनापुर जिल्हा जालना येथील मुख्याध्यापक व संस्थेचे सचिव यांच्याकडून होणाऱ्या अन्यायाविरुद्ध मराठवाडा शिक्षक संघासह अन्यायकारक शिक्षक यांच्या बाजूने आमरण उपोषण उद्यापासून शिक्षणाधिकारी माध्यमिक जि प जालना यांच्या कार्यालयासमोर होणार आहे.

आमरण उपोषणामध्ये प्रमुख मागण्या पुढील प्रमाणे, शालेय प्रशासनाकडून होणाऱ्या आर्थिक व मानसिक छळ थांबवावा, जबरदस्तीने घेतलेले पैसे परत करावे, दमदाटी व छळ तात्काळ थांबवावा, प्रशासनाकडून होणारा शिवीगाळ तात्काळ थांबवावे, शासन नियमाप्रमाणे शाळेची वेळ करावी, थकीत वेतन देण्यात यावे, शिक्षक हजरीपटावर स्वाक्षऱ्या नियमित घेण्यात याव्या, मुख्याध्यापकाची हुकूमशाही व त्यांच्याकडून होणारा कर्मचाऱ्यातील भेदभाव थांबवावा, नियुक्ती आदेश व मान्यता आदेशाच्या प्रति तात्काळ देण्यात याव्या, तेव्हा पुस्तिकेची दुय्यम प्रत तात्काळ देण्यात यावी, शालेय पोषण आहाराच्या गैरव्यवहाराची चौकशी करावी, दोषीवर कारवाई करण्यात यावी, जबरदस्तीने कोरे चेक सही केलेले ते परत करावे, महावर पगार पत्रके देण्यात यावी, आयकारातील १६a पत्रके **पान २ वर**

### या उपोषणातील प्रमुख मागण्या

- शालेय प्रशासनाकडून होणारा आर्थिक व मानसिक छळ तात्काळ थांबवावा.
- जबरदस्तीने घेतलेले पैसे आणि कोरे धनादेश (blank checks) परत करावेत.
- दमदाटी, शिवीगाळ आणि छळ तात्काळ थांबवावा.
- थकलेले वेतन आणि मासिक पगारपत्रके (pay slips) देण्यात यावीत.
- शाळेची वेळ शासन नियमानुसार करावी.
- शिक्षकांच्या हजेरीपटावर नियमित स्वाक्षऱ्या घेण्यात याव्यात.
- मुख्याध्यापकाची हुकूमशाही आणि कर्मचाऱ्यांमधील भेदभाव थांबवावा.
- नियुक्ती आणि मान्यता आदेशाच्या प्रती तसेच सेवापुस्तिकेची (service book) दुय्यम प्रत तात्काळ देण्यात यावी.
- शालेय पोषण आहाराच्या गैरव्यवहाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी.
- आयकर विभागासाठी लागणारे फॉर्म १६ चे पत्रक देण्यात यावे.

# सदर बाजार पोलिसांकडून ३.५९ लाखांचा गुटखा जप्त



**जालना । प्रतिनिधी** - सदर बाजार पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने मंगळवार (दि १२) रोजी मंगळबाजार परिसरात छापा टाकून अवैध गुटखा आणि पानमसाल्याचा मोठा साठा जप्त केला. या कारवाईत पोलिसांनी ३,५९,१४०/- किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे. आरोपी नझीर छोटेमिया पठाण आणि त्याचा भाऊ नसीर खॉन छोटेमिया खॉन यांना अटक करण्यात आली आहे. मंगळबाजार, जालना येथील नझीर पठाण याच्या घराजवळ आणि घरात ही कारवाई करण्यात आली. यात **पान २ वर**

## संपादकीय

# भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा बीजमंत्र



१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश स्वातंत्र्य झाला. आपल्या स्वातंत्र्याला यावेश्री ७८ पूर्ण होत आहे. हे स्वातंत्र्य आपल्याला सहजासहजी मिळाले नाही त्यासाठी मोठा लढा लढावा लागला. या स्वातंत्र्य लढ्याचा बीज मंत्र वंदे मातरम हे गीत होते. इंग्रजांच्या गुलामीतून देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लाखो क्रांतिकारकांनी प्राणाची बाजी पावली. हजारो हुतात्म्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. या हजारो हुतात्म्यांना फासावर लटकताना किंवा इंग्रजांच्या गोळ्या झेलताना शेवटचा शब्द होता तो म्हणजे वंदे मातरम. वंदे मातरम हे भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे ब्रीदवाक्य होते असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. १८८५ पूर्वीचा तो काळ होता. इंग्रजांच्या जुलमी राजवटीला भारतीय जनता कंटाळली होती. इंग्रजांची ही जुलमी राजवट उलथवून लावण्यासाठी नागरिक एकत्र येत होते.अनेक छोटे मोठे समूह इंग्रजांविरुद्ध आवाज उठवत होते त्यामुळे भारतीयांमध्ये स्वातंत्र्याची भावना जागृत होऊ लागली होती. अशा वातावरणात वंदे मातरम या गीताचा जन्म झाला. बंकीमचंद्र चॅटर्जी यांनी कोलकाता विश्व विद्यालयातून बी ए ची पदवी पूर्ण केली होती. इंग्रज सरकारने त्यांची कोलकात्याच्या डिस्ट्रिक मॅजिस्ट्रेटपदी निवड केली. नंतर ते कोलकात्याचे डिस्ट्रिक कलेक्टर बनले. बंकीम चंद्र चॅटर्जी हे जरी इंग्रजांच्या सेवेत होते तरी ते प्रखर देशभक्त होते. १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्याचे त्यांना खूप आकर्षण होते. १८५७ साली इंग्रजांनी त्यांचे गॉड सेव्ह द क्वीन हे राष्ट्रगीत भारतात रुजू करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे हे राष्ट्रगीत भरताचेच राष्ट्रगीत आहे असे भासवण्याचा प्रयत्न सुरू झाला. त्यामुळे बंकीमचंद्र चॅटर्जी खूप अस्वस्थ झाले. इंग्रज आपले राष्ट्रगीत भारतावर कसे थोपवू शकतात असा प्रश्न त्यांना पडला. भारतीय लोकही इंग्रजांच्या राष्ट्रगीताचा तिरस्कार करीत होते. त्यांनी यावर गहन अभ्यास केला तेंव्हा त्यांच्या लक्षात आले की हजारो वर्षांच्या गुलामगीरीमुळे भारत हा कधीच अखंड देश नव्हता त्यामुळे भारताला स्वतःचे राष्ट्रगीत नव्हते. म्हणून ७ नोव्हेंबर १८७६ रोजी त्यांनी भारत भूमीला मातृभूमी असे संबोधित करून तिचे नमन करणारे वंदे मातरम हे सहा कडव्यांचे एक देशभक्तीपर गीत लिहिले. त्यांनी हे गीत आपल्या मित्रांना म्हणून दाखवले. तेंव्हा मित्र त्यांना म्हणाले हे गीत भारताचे राष्ट्रगीत बनले पाहिजे. १८८२ साली बंकीम चंद्र चॅटर्जी यांनी आनंद मठ नावाची एक कादंबरी लिहिली. या कादंबरीत त्यांनी वंदे मातरम हे गीत समाविष्ठ केले. आनंद मठ या कादंबरीला लोकांचा खूप प्रतिसाद मिळाला. अल्पावधीतच ही कादंबरी लोकप्रिय झाली. त्याकाळात लोकांनी त्या कादंबरीचे पारायण केले. त्यामुळे वंदे मातरम हे गीत देखील लोकप्रिय झाले. १८९६ साली काँग्रेसच्या कोलकता येथील अधिवेशनात रवींद्रनाथ टागोर यांनी वंदे मातरम हे गीत गायले. या गीताने संपूर्ण अधिवेशन देशभक्तीच्या भावनेने भारावून गेले. १९०१ साली कोलकाता मध्येच झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात सामूहिक रित्या हे गीत गाण्यात आले. सर्व भारतीयांना हे गीत तोंडपाठ झाले. वंदे मातरम हे भारताचे राष्ट्रगीत आहे असे मानुनच लोक हे गीत गाऊ लागले त्यामुळे १९०५ साली इंग्रजांनी या गीतावर बंदी घातली. तरीसुद्धा बनारस विश्व विद्यालयात रवींद्र नाथ टागोर यांची पुतणी सरला देवी यांनी हे गीत गायले. १९०५ मध्ये इंग्रजांनी बंगालची फाळणी केली. या फाळणीच्या विरोधात झालेल्या प्रचंड आंदोलनात हे गीत जागृतीचा शंखनाद बनले. हिंदू मुस्लिम सर्वांनी या गीताचे मुक्तकंठाने गायन केले. या फाळणी विरोधात लोक रस्त्यांवर उतरले अखेर इंग्रजांनी शरणागती पत्करून बंगालची फाळणी रद्द केली. इंग्रजांविरुद्ध लोकांना एकजूट करण्यात वंदे मातरम या गीताचा मोठा वाटा होता. वंदे मातरम हा शब्द क्रांतीचा समानार्थी शब्द बनला. जो तो आपल्या भारत भूमीला वंदन करुन म्हणजे वंदे मातरम गीत म्हणून स्वातंत्र्य लढयात सहभागी होऊ लागला. १९०४ साली भगिनी निवेदिता यांनी भारताच्या राष्ट्रध्वजाची रूपरेषा तयार केली यात या ध्वजात वर हिरवा मध्ये पिवळा व तळाशी केशरी रंग होता. वरच्या हिरव्या रंगावर कमळाची आठ फुले होती. खालच्या केशरी रंगावर चंद्राच्या आणि सूर्याच्या आकृत्या होत्या तर मधल्या पिवळ्या रंगावर वंदे मातरम असे लिहिले होते. १९०७ साली बर्लिन येथे वंदे मातरम लिहिलेला भारताचा हा ध्वज फडकवण्यात आला होता. लाला लजपतराय हे लाहोरहून एक पाक्षिक चालवत. या पाक्षीकाचे नावही वंदे मातरम हेच होते. देश स्वातंत्र्य झाल्यावर वंदे मातरम या गीताच्या पहिल्या कडव्याला राष्ट्रगीताचा दर्जा देण्यात आला आहे. आज देशाचा ७९ वा स्वातंत्र्यदिन साजरा करताना भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा बीजमंत्र बनलेल्या वंदे मातरमचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. वंदे मातरम

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# अवयव दान करा; परोपकारी मार्ग धरा!

जागतिक अवयवदान दिन हा एक महत्त्वाचा जागतिक कार्यक्रम आहे जो यूएसए मध्ये १९५४ मध्ये झालेल्या पहिल्या जिवंत दात्याच्या अवयव प्रत्यारोपणाच्या स्मरणार्थ आहे. अवयवदान जनजागृती करण्यासाठी आणि अधिकाधिक लोकांना अवयवदान करण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो.

जगभरात दरवर्षी १३ ऑगस्ट रोजी जागतिक अवयव दान दिन साजरा केला जातो. या दिवसाचे उद्दिष्ट आहे, लोकांमध्ये अवयव दानाबाबत जागरूकता वाढवणे आणि अवयव दानाच्या महत्त्वाबद्दल जनजागृती करणे. अनेक गंभीर आजारांमध्ये अवयव प्रत्यारोपण हेच एकमेव उपाय असतो. परंतु, अवयव दान करणार्यांची संख्या कमी असल्यामुळे अनेक रुग्णांना वेळेवर अवयव मिळत नाहीत आणि त्यामुळे त्यांच्या जीवाला धोका निर्माण होतो. अवयव दानामुळे मरणोत्तरही एखाद्याचे जीवन उपयोगी ठरू शकते. एखाद्या व्यक्तीच्या निधनानंतर त्याचे हृदय, यकृत, मूत्रपिंड, फुफ्फुसं इत्यादी अवयव इतर गरजू रुग्णांसाठी वापरले जाऊ शकतात. एका अवयव दानाने आठ ते दहा जणांचे जीव वाचवले जाऊ शकतात.

आपल्या देशात आणि समाजात अवयव दानाबाबत अनेक गैरसमज आणि भीती आहेत. म्हणूनच, जागतिक अवयव दान दिनाचे उद्दिष्ट आहे या विषयावर खुली चर्चा घडवून आणणे, जनजागृती करणे, आणि जास्तीत जास्त लोकांना अवयव दानासाठी प्रोत्साहित करणे. अवयव दान हा एक परोपकारी आणि महान कार्य आहे, ज्यामुळे आपण इतरांना जीवनदान देऊ शकतो. जागतिक अवयवदान दिन हा एक महत्त्वाचा जागतिक कार्यक्रम आहे जो यूएसए मध्ये सन १९५४मध्ये झालेल्या पहिल्या जिवंत दात्याच्या अवयव प्रत्यारोपणाच्या स्मरणार्थ आहे. अवयवदान जनजागृती करण्यासाठी आणि अधिकाधिक लोकांना अवयवदान करण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो.

**ध्यानं परं कृतयुगे त्रेतयां ज्ञानमुच्यते।**
**दवापरे यज्ञमेवाहू: दानमेव कलौयुगे।।**

कृत युगात ध्यान, त्रेता युगात ज्ञान, द्वापार युगात यज्ञ आणि कलियुगात दान हे साधन असल्याचा उल्लेख कुर्म पुराणात आढळतो. कलियुगात दानाला महत्व दिले असल्याने भुदान, गोदान, संपत्तीचे दान, अन्नदान, वस्त्रदान, नेत्रदान, रक्तदान, किडणीदान, या स्वरूपाचे दान आवश्यक केल्याचे आढळून येते. पौराणिक कथांमध्ये दधिची ऋषींनी वृत्तसुराला मारण्यासाठी आपल्या अस्थींचे इंद्राला दान दिले होते, शिबी राजाने कबुतराचे प्राण वाचविण्यासाठी आपल्या अंगावरचे मासं दान दिले तर कर्णाने जन्मतःच शरीराचा एक भाग म्हणून लाभलेले कवच-कुंडले दान केले. अशा पौराणिक कथा ऐकल्यानंतर वाटतं की, पुराण काळापासूनच अवयव दानाची संकल्पना रूढ आहे. त्यावरूनच पुराण काळापासून भारतीय संस्कृतीत दानाचे अनन्यसाधारण महत्व असल्याचे लक्षात येते. ऑगस्ट २०१६पासून राज्यात अवयवदानाविषयी विविध उपक्रम राबवले जात आहेत. सर्वच माध्यमातून अवयवदान करण्याबाबत जनजागृती होत असून दिवसेंदिवस अवयवदानाच्या मोहिमेला समाजातून प्रतिसाद मिळत आहे. परंतू तो प्रत्यक्षात अंमलात आणणाऱ्यांची संख्या त्यामानाने कमी आहे. अवयवदान करणाऱ्या व्यक्तिंपेक्षा गरजू व्यक्तिंची यादी मोठी आहे. त्यामुळे अवयवदान करण्यासाठी प्रत्येकाने आपला सहभाग नोंदविणे आश्यक आहे. वैद्यकिय क्षेत्रात झालेल्या प्रगतीमुळे अवयवदान करण्याची प्रक्रिया काही प्रमाणात सोपी झाली आहे.

अवयवदान हे दोन प्रकारे करता येते- १) जिवंतपणी करता येणारे अवयवदान आणि २) मरणोत्तर करण्यात येणारे अवयवदान. जिवंतपणी अवयवदान करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रादेशिक प्रत्यारोपण समन्वयक केंद्र या अधिकृत संस्थेची परवानगी असते. अवयवदानानंतर दात्याच्या प्रकृतीवर दुष्परिणाम होणार नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतरच ही परवानगी दिली जाते. त्यामुळे जिवंतपणी किडणी व यकृताचे काही प्रमाणात दान करता येते. तसेच रक्त हे देखील मानवी शरीराचा अविभाज्य भाग आहे. मानवी शरीराचे संतुलन राखण्यासाठी रक्ताची निर्मिती होत असते. त्यामुळे ठराविक कालावधीमध्ये रक्तदान करणे हे आरोग्यासाठी चांगले असल्याचे सांगण्यात येते. मृत्यूनंतर अवयवदान करण्यासाठी मृत्यू कोणत्या कारणाने झाला हे तपासले जाते. त्याअंतर्गत हृदय बंद पडून होणारा मृत्यू जसे वृद्धापकाळाने किंवा नैसर्गिक मृत्यू असतो. नैसर्गिक मृत्यूनंतर आपण फक्त नेत्रदान, त्वचादान आणि हृदयाच्या झडपा दान करू शकतो. मेंदू बंद पडून होणारा मृत्यू म्हणजे ज्याला ब्रेन डेथ संबोधले जाते. यामध्ये मेंदूला इजा झाल्याने माणसाचा मृत्यू होतो. अशा मृत्यूमध्ये माणसाचा फक्त मेंदू मृत पावलेला असला तरीही हृदय, यकृत, मूत्रपिंड, फुफ्फुस हे सर्व अवयव चालू स्थितीत असल्याने त्यांचे दान करता येते.

मेंदूमृत व्यक्ती व कोमामध्ये गेलेली व्यक्ती यामध्ये बराचसा फरक आहे. कोमामध्ये असलेल्या व्यक्तिच्या मेंदूचे कार्य चालू असते आणि त्यामुळे कोमामध्ये गेलेली व्यक्ती शुद्धीवर येण्याची शक्यता असते. परंतु मेंदूमृत झालेली व्यक्ती कधीही परत जिवंत होऊ शकत नाही. म्हणून मेंदूमृत व्यक्ती मृत्युसमयी दवाखान्यात आयसीयुमध्ये असेल व मृत्यूपूर्वी अवयवदान करण्याचे संबंधित व्यक्तीने जाहीर केले असेल तरच अवयवदान करता येऊ शकते. असे करण्यासाठी कमीत कमी चार डॉक्टरांच्या समितीने त्या व्यक्तीची तपासणी करून त्यास मेंदूमृत घोषित करणे कायद्याने बंधनकारक आहे. मृत्यूनंतर नेत्र, मेंदू, हृदय, त्वचा अशा विविध अवयवांचे दान करून एक व्यक्ति दोन-तीन व्यक्तिंच्या रूपाने जिवंत राहू शकते. श्रीलंकेसारखा छोटासा देश नेत्र निर्यातीत जगात पहिल्या स्थानावर आहे. अनेक देशात मृत व्यक्तिने मरण्याआधी आपले अवयवदान करू नये, असे स्पष्ट जाहीर केले असेल तरच त्या व्यक्तिचे अवयवदान केले जात नाही. अन्यथा प्रत्येक व्यक्तिची अवयवदानाला मान्यता आहे, असे मानून त्याबाबत त्वरीत कार्यकाही करण्यात येते. आज अवयवदानाविषयी सर्वस्तरावर जनजागृती करणे आवश्यक झाले आहे. अवयवदान व देहदान या दोन्हीमध्ये फरक आहे. अवयवदान हे जिवंतपणी व मरणानंतरही करता येते. मृत्यूपश्चात करण्यात येणाऱ्या अवयवदानानंतर मृत शरीर हे नातेवाईकांच्या ताब्यात देताना ते व्यवस्थित प्रक्रिया करून दिले जाते. ज्यामुळे एखादा अवयव काढून घेतल्याच्या कोणत्याही खुणा दर्शनी भागावर दिसून येत नाहीत. त्यामुळे अवयवदान केल्यानंतर धार्मिक विधी करण्यासाठी कोणतीही अडचण येत नाही. अवयवदान करताना शरीरातील ठराविक अवयवच दान केले जातात. परंतू देहदान हे फक्त मरणानंतरच एखाद्या वैद्यकीय महाविद्यालयात डॉक्टरांना मानवी शरीराच्या अभ्यास, प्रात्यक्षिक व संशोधन करण्यासाठी दिले जाते. देहादानानंतर असे मृत शरीर धार्मिक विधी करण्यासाठी नातेवाईंकांकडे दिले जात नाही तर ते फक्त संशोधनासाठीच वापरले जाते.

कोणत्याही स्वरूपाचे दान असो ते गरजू व्यक्तिंना केले तर त्याला अधिक महत्व प्राप्त होते. आपल्याकडील संपत्ती ही गरजूंना दान केल्यास ईश्वरभाव प्राप्त होतो, असे म्हणतात. त्याअनुषंगाने नाशवंत मानवी शरीर मातीत विलीन करण्यापेक्षा आपली देहरूपी संपत्ती मरणोत्तर दान केली तर अनेकांचे प्राण वाचविल्याचे पुण्य प्राप्त होईल. असे अवयवदान करणारा दाता मरणानंतरही जीवन जगतो असे म्हणता येईल. अवयव दान ही प्रक्रिया आहे जेव्हा एखादी व्यक्ती स्वतःचा अवयव काढून दुसऱ्या व्यक्तीला प्रत्यारोपण करण्यास अधिकृत करते, कायदेशीररित्या, एकतर देणगीदार जिवंत असताना संमतीने, मृत्यूपूर्वी केलेल्या मृत देणगीसाठी कायदेशीर अधिकृततेद्वारे किंवा मृत देणगीसाठी. कायदेशीर नातेवाईकांच्या अधिकृततेद्वारे

देणगी संशोधनासाठी असू शकते किंवा अधिक सामान्यपणे, निरोगी प्रत्यारोपण करण्यायोग्य अवयव आणि ऊती दुसऱ्या व्यक्तीमध्ये प्रत्यारोपित करण्यासाठी दान केले जाऊ शकतात. सामान्य प्रत्यारोपणामध्ये मूत्रपिंड, हृदय, यकृत, स्वादुपिंड, आतडे, फुफ्फुसे, हाडे, अस्थिमज्जा, त्वचा आणि कॉर्निया यांचा समावेश होतो. काही अवयव आणि ऊती जिवंत दात्यांद्वारे दान केल्या जाऊ शकतात, जसे की मूत्रपिंड किंवा यकृताचा काही भाग, स्वादुपिंडाचा काही भाग, फुफ्फुसाचा काही भाग किंवा आतड्यांचा काही भाग, परंतु बहुतेक दान दात्याने केल्यानंतरच होतात. सन २०१९साली स्पेनमध्ये प्रति दशलक्ष लोकसंख्येमध्ये ४६.९१ हा जगातील सर्वाधिक देणगीदार दर होता, त्यानंतर यूएस- ३६.८८ प्रति दशलक्ष, क्रोएशिया-३४.६३ प्रति दशलक्ष, पोर्तुगाल-३३.८प्रति दशलक्ष आणि फ्रान्स-३३.२५ प्रति दशलक्ष देणगीदार दर ठरविण्यात आला. दि.२फेब्रुवारी २०१९पर्यंत युनायटेड स्टेट्समध्ये १,२०,००० लोक जीवरक्षक अवयव प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत होते. यापैकी ७४,८९७ लोक रक्तदात्याच्या प्रतीक्षेत सक्रिय उमेदवार होते. अवयवदानाबाबतचे मत सकारात्मक असले तरी, जागतिक स्तरावर अवयवदानाच्या प्रतीक्षेत असलेल्यांच्या तुलनेत नोंदणीकृत दात्यांच्या संख्येत मोठी तफावत आहे. अवयव दात्यांची संख्या वाढवण्यासाठी, विशेषतः कमी लोकसंख्येमध्ये, सध्याच्या पद्धतींमध्ये ऑप्टिमइझ केलेल्या सोशल नेटवर्क हस्तक्षेपांचा वापर करणे, सोशल मीडिया वापरकर्त्यांना लक्ष्य करण्यासाठी अवयव दानाबद्दल तयार केलेली शैक्षणिक सामग्री उघड करणे समाविष्ट आहे. अवयवदानाच्या महत्त्वाबाबत जनजागृती करण्यासाठी दरवर्षी १३ ऑगस्ट हा दिवस जागतिक अवयवदान दिन म्हणून पाळला जातो. कारण अवयवदान काळाची गरज भासू लागली आहे. आंतरराष्ट्रीय अवयव दान दिनाच्या सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छाजी.

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे**
**श्रीगुरूदेव प्रार्थना मंदिराजवळ,**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

# तिरंगा देशाची आन-बाण-शान

शहिदांच्या आठवणी पुन्हा-पुन्हा जागृत व्हाव्यात व नवीन पिढीला शहिदांची,क्रांतिकारकांची, थोरमहात्म्यांची आठवण निरंतर ह्रदयात रहावी व इतिहास जागृत रहावा यादृष्टीकोणातुन १५ ऑगस्टला प्रत्येक घरावर तिरंगा फडकवुन देशाची आन-बाण-शान उंचावण्यासाठी सर्वांनीच अग्रेसर रहायला हवे.कारण तिरंगा भारतासाठी व भारतातील प्रत्येक नागरिकांसाठी अनमोल रत्न आहे.कारण यातुनच क्रांतीची मशाल उदयास आली व १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस उजाडला.यात सुर्याचा प्रखर तेजोमय प्रकाश, चंद्राची शांतीमय प्रतीमा, लखलखत्या ताऱ्यांचे प्रकाशमय वातावरण निर्माण करणे आणि वायू देवतेच्या सहवासाने विराजमान होवून देशाच्या शुरवीरांना व क्रांतिकारकांना तिरंगा सांगतो की मेरा देश महान महाराष्ट्रासह देशातील प्रत्येक राज्यांनी १५ ऑगस्टला वृक्ष लावण्याचा निर्धार करायला हवा.यामुळे १५ ऑगस्टला लावलेले वृक्ष क्रांतिकारकांच्या आठवणीच्या निमित्ताने अनंत काळापर्यंत सर्वांच्याच स्मरणात राहील व संपूर्ण भारतात आपल्याला हिरवागार गालिचा सर्वीकडेच दिसून येईल. १५ ऑगस्टला स्वागत करण्यासाठी आपल्याला संपूर्ण नद्यांचा खळखळाट ऐकु येईल, समुद्र देवता आपल्या लाटांच्या खुशीने स्वागत करेल अशा प्रकारे स्थल,जल,वायु देवता १५ ऑगस्टला स्वागतासाठी सज्ज आहे.देशातील वाढते प्रदुषण व दिवसेंदिवस कमी होत असलेले ऑक्सिजनचे प्रमाण यामुळे पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवजंतु भयभीत आहे. याकरीता १५ ऑगस्टचे औचित्य साधून महाराष्ट्रासह देशातील प्रत्येक राज्यांनी १५ ऑगस्टला झाडे लावण्याचा संकल्प करावा.या वृक्षलागवडीमुळे देशातील वातावरण प्रफुल्लित होईल व आपले पुर्वज आशिर्वाद देतील आणि त्यांना अभिमान होईल की स्वतंत्र भारतात सर्वकाही ठीक आहे. वृक्षलागवडीमुळे गुरांना चारा, सर्वांना शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळेल. आपल्या पुर्वजांनी अनेक कठीण प्रसंगांशी सामना करत १९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले.आज भारताला स्वतंत्र होऊन ७८ वर्षे पूर्ण होत आहे त्यानिमित्याने देशात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.त्या अनुषंगाने संपूर्ण भारतात जय्यत तयारी सुरू आहे.ही अत्यंत आनंदाची व स्वागतार्ह बाब आहे.देश स्वतंत्र करण्यासाठी अनेक थोर महात्मे, क्रांतिकारक,जहालवादी नेते,मवाळवादी नेते यांच्या एकसुत्री कार्यक्रमाने व बलीदानाने १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.त्यामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात मोकळा श्वास घेतो आहे. त्याकाळी स्वातंत्र्यासाठी घरा-घरातुन आवाज बुलंद व्हायचा व स्वातंत्र्यासाठी संघर्षमय वातावरण निर्माण करून संपूर्ण युवावर्ग इंग्रजांशी लोहा(टक्कर)घेण्यासाठी काहीही करायला तयार रहायचे. आज आपल्याला आपल्या क्रांतिकारकांचे, शहिदांचे, थोरमहात्म्यांचे अनुकरण करून त्यांनी मिळवुन दिलेल्या स्वातंत्र्याची आठवण म्हणून आणि देश स्वतंत्र होऊन ७८ वर्षे पूर्ण होत असल्याचे पाहून प्रत्येकांनी १५ ऑगस्टला आप-आपल्या घरावर तिरंगा फडकवीलाच पाहिजे असा प्रण देशाच्या १४० कोटी जनतेनी घेतला पाहिजे. असे जर झाले तर तिरंगा एवढ्या उंचावर गेलेला आपल्याला दिसेल की संपूर्ण जग आश्चर्य चकित होईल व म्हणतील खरोखरच भारत देश महान. कारण जगाच्या पाठीवर भारत असा एकमेव देश आहे की याठिकाणी अनेक धर्माचे, पंथाचे,जातीचे व संस्कृतीचे लोक एकोप्याने रहातात. जेव्हा -देशाच्या एकतेचा आणि अखंडतेचा प्रश्न येतो तेंव्हा-तेव्हा एकनिष्ठेने कार्य करतात. त्यामुळे भारतातील १४० कोटी जनता आप आपल्या घरावर तिरंगा फडकवुन जगाला आपली ऐकता अवश्य दाखवेल. कारण भारतातील छोटे-मोठे सर्वच जाणतात की देश स्वतंत्र करण्यासाठी शुरविरांना, क्रांतिकारकांना अनेक यातना सहन कराव्या लागल्या, बलिदान द्यावे लागले,फासावर जावे लागले, घर-दार सोडावे लागले तेव्हाच भारत स्वतंत्र झाला.आपण शुरविरांना, क्रांतिकारकांना,थोरमहात्म्यांना सुईच्या टोकायेवढीही मदत करू शकत नाही. परंतु १५ ऑगस्टला प्रत्येकांनी आपापल्या घरावर तिरंगा फडकवुन आपल्या पुर्वजाच्या आठवणी ताज्या करू शकतो.आजही प्रत्येक व्यक्तीच्या आत्म्यात आपल्या पुर्वजांच्या आठवणी आहेत व स्वाभिमान आहे यात दुमत नाही.कारण जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश-पाताळ आहे तोपर्यंत भारत भुमितील प्रत्येक व्यक्ती स्वातंत्र्यवीरांना, शहिदांना, क्रांतिकारकांना,थोरमहात्म्यांना आपल्या काळजात ठेवून स्मरणात ठेवील.आपले पुर्वज आपल्याला कुठुनतरी अवश्य पहात असेलच त्यामुळे त्यांच्या स्मरणार्थ प्रत्येकांनी आपापल्या घरावर तिरंगा फडकवुन शहिदांना स्मरण केले पाहिजे व याच दिवसाचे औचित्य साधून प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावुन वाढत्या प्रदूषणावर मात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.यामुळे प्रत्येक झाडाच्या पानात,फुलात आपल्याला क्रांतिकारकांचे दर्शन अवश्य होईल.आज देशाची स्थल सेना, वायुसेना, नौसेना तिरंग्याचा स्वाभिमान अबाध्य रहावा यासाठी अहोरात्र देशाच्या सुरक्षेसाठी तत्पर दिसून येतात.त्यामुळे तिरंगा देशातील सिमावर्ती भागातील सैनिकांसाठी भारतमातेचा आत्मा आहे.जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## पान १ वरुन

### मराठवाडा शिक्षक ...

देण्यात यावी, या मुख्य मागण्यासह इतरही मागण्या साठी आमरणउपोषण उद्यापासून होणार असून यास मराठवाडा शिक्षक संघाचा पाठिंबा आहे आमरण उपोषणाला बसणारे शिक्षक प्रभाकर गणपत ढाकणे, दत्तू ज्ञानदेव एखंडे, गौतम कचरू थोरात, हे असून त्यांनी या प्रकार मागण्यासाठी अमरून उपोषणाचा मार्ग निवडला आहे. मराठवाडा शिक्षक संघटनेचे केंद्रीय कार्य करण्याचे उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवडे यांनी आमच्या वृत्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की जिल्हा प्रशासनाने शिक्षणाधिकारी यांनी तात्काळ या गोष्टीकडे लक्ष घालून आमरण उपोषण होण्याआधीच सर्व मागण्या मंजूर कराव्यात, शिक्षकांवर होणारा अन्याय हा थांबवावा तसेच जिल्ह्यातील इतर शाळांमध्ये सुद्धा अशा प्रकारचे आज जर असेल तर संपूर्ण जिल्ह्यासाठी स्वतंत्र परिपत्रक काढून हा तास थांबवावा अशी मागणी करण्यात आली आहे.

### सदर बाजार ...

गोवा १००० गुटख्याची २६० पाकिटे, Siggnature पान मसाल्याची २४० पाकिटे, Action Scented Tobacco ची १०८ पाकिटे, एक IQUBE MH21CF7108 दुचाकी (किंमत १,५०,०००/-). जप्त करण्यात आलेल्या गुटखा आणि पान मसाल्याची किंमत २,०९,१४०/- असून, दुचाकीसह एकूण मुद्देमालाची किंमत ३,५९,१४०/- आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक संदीप भारती यांच्या नेतृत्वाखाली डीबी पथकाचे प्रमुख शैलेश म्हस्के आणि त्यांच्या टीमने केली. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकारी प्रज्ञा सूरसे यांनीही या कामात मदत केली. सदर बाजार पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


# परतुरमधील खासगी शाळांची मनमानी

## महागड्या फी आणि गणवेशाच्या सक्तीने पालक त्रस्त

**परतुर । प्रतिनिधी -** तालुक्यातील इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये सुरू असलेल्या मनमानी कारभाराविरोधात पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. शिक्षण विभागाला कोणतीही माहिती न देता दरवर्षी केली जाणारी भरमसाठ फी वाढ आणि विशिष्ट दुकानातूनच महागडे गणवेश खरेदी करण्याची सक्ती यामुळे पालकांचे आर्थिक बजेट कोलमडले आहे. शिक्षण विभागाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी जोर धरत आहे.

परतुर शहरासह आसपासच्या भागात खासगी इंग्रजी शाळांचे जाळे मोठ्या प्रमाणावर पसरले आहे. या शाळांकडून शिक्षण विभागाच्या नियमांना धाब्यावर बसवून मनमानी फी आकारली जात असल्याचा आरोप पालक करत आहेत. नर्सरीच्या विद्यार्थ्यांकडूनही कॉलेजच्या विद्यार्थ्यांप्रमाणे फी घेतली जाते, तरीही शिक्षण विभाग याकडे दुर्लक्ष का करत आहे? असा संतप्त सवाल आम आदमी पार्टीचे प्रवक्ते पी. एल. गायके यांनी उपस्थित केला आहे. शिक्षण विभाग आणि खासगी शाळा यांच्यात काहीतरी 'छुपी युती' असल्याचा संशयही व्यक्त केला जात आहे.

सर्वसामान्य कुटुंबातील पालकांना ही भरमसाठ फी भरणे शक्य होत नसल्याने, त्यांच्या मुलांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होत आहेत. फी भरण्यास थोडाही विलंब झाल्यास विद्यार्थ्यांना वर्गातच




अपमानित करून बाहेर काढले जाते, अशा अनेक घटना घडल्याचे पालकांनी सांगितले. त्यामुळे प्रत्येक शाळेसाठी त्यांच्या सुविधांनुसार फीचे निकष ठरवून देणे आवश्यक असल्याची मागणी पालकांनी केली आहे.

फी व्यतिरिक्त, गणवेशाचा मुद्दाही पालकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. अनेक शाळांनी शहरातील एकाच दुकानदाराला गणवेश विक्रीचा ठेका दिला आहे. यामुळे तीन ते चार हजार रुपये किंमतीचे गणवेश नाईलाजाने त्याच दुकानातून खरेदी करावे लागतात. पालक रोहित अग्रवाल यांनी याबाबत नाराजी व्यक्त केली. माझ्या मुलाच्या शाळेचा गणवेश तीन-चार हजार रुपयांचा आहे आणि तो विशिष्ट दुकानातच उपलब्ध होतो. हे एक प्रकारे खासगी शाळा आणि दुकानदारांकडून केली जाणारी लुटमार आहे, असे ते म्हणाले.

या समस्येवर तोडगा काढण्यासाठी सर्वच दुकानांमध्ये गणवेश उपलब्ध करून द्यावेत आणि कापडाच्या दर्जानुसारच किंमत आकारावी, अशी रास्त मागणी पालकांनी केली आहे. शिक्षण विभागाने या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून विनापरवाना चालणाऱ्या शाळांवर कारवाई करावी, अशी मागणीही होत आहे.

एकंदरीत, खासगी शाळांच्या या मनमानीमुळे पालक वर्गामध्ये संताप आणि चिंतेचे वातावरण आहे. शिक्षण विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन कठोर पावले उचलल्यास पालकांना मोठा दिलासा मिळू शकेल.

# जालना जिल्हा फोटोग्राफर्स असोची नवीन कार्यकारिणी जाहीर



**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा फोटोग्राफर्स असोसिएशनच्या वतीने एका हॉटेलमध्ये झालेल्या बैठकीत जागतिक छायाचित्र दिन महोत्सव समिती २०२५ ची कार्यकारिणी घोषित करण्यात आली. या बैठकीत सर्वानुमते नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे.

**नवीन कार्यकारिणीमध्ये निवड झालेले पदाधिकारी:**

अध्यक्षः विष्णू जाधव, उपाध्यक्षः नितेश सोलाट, सचिवः ललेश वरगंटे, कोषाध्यक्षः अभिषेक डुकरे यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष अनिल व्यवहारे, मार्गदर्शक राजेश खर्डेकर, उपाध्यक्ष सोनाजी ननावरे, सचिव मधुसूदन दंडारे, सहसचिव शाम गिराम यांच्यासह कार्यकारिणी सदस्य आणि अनेक छायाचित्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिद्धार्थ महाविद्यालयात रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून वृक्ष रक्षाबंधन साजरा

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** सिद्धार्थ महाविद्यालय, जाफ्राबाद येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत विविध सण उत्सव साजरे करून त्यामागील महत्त्व विद्यार्थ्यांमध्ये रूजविण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणून दि. ११ ऑगस्ट, २०२५ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने प्राचार्य डॉ.रमेश देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्ष रक्षाबंधन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



रक्षाबंधन सणानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवकांमार्फत महाविद्यालय परिसरात असलेल्या विविध वृक्षांना राखी बांधण्यात आली व याद्वारे वृक्षांप्रतीची आत्मीयता व्यक्त करून याद्वारे पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला. तसेच विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांना राखी बांधून रक्षाबंधन मोठ्या उत्साहात साजरा केला.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.शिवाजी जगतवाड, प्रा.डॉ.प्रदीप मिसाळ, प्रा.श्रीमती.सरिता मणियार तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास विद्यार्थी, रा.से.यो. स्वयंसेवक प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जालन्यात स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून 'मॉक ड्रिल'

**जालना । प्रतिनिधी -** स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जालना पोलिसांनी आज, शहरात 'मॉक ड्रिल' (बनावट कवायत) आयोजित केले. कोणत्याही संभाव्य आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी पोलीस दल किती सज्ज आहे, हे तपासणे हा या कवायतीचा मुख्य उद्देश होता.

जालना शहरातील विविध संवेदनशील ठिकाणी हे मॉक ड्रिल पार पडले. यात पोलिसांनी अचानक उद्भवणाऱ्या परिस्थितीला कसे हाताळावे, याचे प्रात्यक्षिक दाखवले. दहशतवादी हल्ला, बॉम्बस्फोटाची धमकी किंवा दंगलसदृश परिस्थिती अशा संभाव्य धोक्यांचा सामना करण्यासाठी पोलिसांना कमीत कमी वेळेत आणि योग्य पद्धतीने प्रतिसाद देण्यासाठी हे प्रशिक्षण देण्यात आले.

या मॉक ड्रिलमध्ये पोलीस दलाच्या विविध तुकड्या, बॉम्बशोधक व नाशक पथक, श्वानपथक, आणि अग्निशमन दलाच्या गाड्या सहभागी झाल्या होत्या. या तुकड्यांनी आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ घटनास्थळी पोहोचून परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रात्यक्षिक केले. यामुळे, स्वातंत्र्य दिनाच्या काळात कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडल्यास पोलीस दल सज्ज असल्याची खात्री नागरिकांना मिळते.

या कवायतीमुळे जालना शहरातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. पोलिसांनी केलेल्या या तयारीमुळे स्वातंत्र्य दिनाचा सोहळा शांततेत



आणि निर्धोकपणे पार पडेल, असा विश्वास जनतेला वाटत आहे. पोलीस अधीक्षक आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या मॉक ड्रिलची पाहणी केली आणि सर्व विभागांना सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत.

पोलीस प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, स्वातंत्र्य दिनानिमित्त शहरातील मुख्य चौक, सरकारी कार्यालये, आणि सार्वजनिक ठिकाणी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. तसेच, शहरातील प्रत्येक हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे आणि इतर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे.

एकंदरीत, जालना पोलिसांचे हे मॉक ड्रिल केवळ एक कवायत नसून, शहराच्या सुरक्षिततेसाठी आणि नागरिकांना निर्भय वातावरणात सण साजरा करता यावा यासाठीची एक महत्त्वाची तयारी आहे.

## जालन्यात भाजपची 'हर घर तिरंगा' रॅली

# देशभक्ती आणि सामाजिक एकतेचा संगम

**जालना । प्रतिनिधी -** भारताच्या ७९व्या स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'हर घर तिरंगा' संकल्पनेला जालन्यात मोठा प्रतिसाद मिळत आहे. याचाच एक भाग म्हणून आज, १३ ऑगस्ट रोजी, भारतीय जनता पक्षाच्या वतीने शहरात भव्य तिरंगा पदयात्रा काढण्यात आली. या रॅलीमध्ये नागरिक, विद्यार्थी, व्यापारी आणि विविध सामाजिक संघटनांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून देशभक्तीचा उत्साह द्विगुणित केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'हर घर तिरंगा' अभियानाची घोषणा देशातील प्रत्येक नागरिकाच्या मनात राष्ट्रध्वजाबद्दल अभिमान आणि आत्मीयता वाढवण्यासाठी केली आहे. याच उद्देशाने भाजपच्या वतीने आयोजित या रॅलीने जालन्यातील वातावरणात देशभक्तीची लाट आणली. ही रॅली केवळ राजकीय कार्यक्रम नसून, ती सामाजिक एकोपा आणि राष्ट्रनिष्ठा जागृत करणारा एक महत्त्वाचा उपक्रम ठरली.

सकाळी ११ वाजता शांतीनिकेतन विद्या मंदिर येथून माजी आमदार कैलास गोरंट्याल आणि भाजपचे जिल्हाध्यक्ष भास्करआबा दानवे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅलीला सुरुवात झाली. ही पदयात्रा डॉ. मणियार हॉस्पिटल, गोपीनाथ मुंडे चौक आणि चित्रकूट बालाजी चौक या प्रमुख मार्गांनी पुन्हा शांतीनिकेतन विद्या मंदिर येथे येऊन संपन्न झाली.

या रॅलीमध्ये सहभागी झालेल्यांची संख्या लक्षणीय होती. शांतीनिकेतन विद्या मंदिराचे विद्यार्थी, शिक्षक, शहरातील नागरिक, व्यापारी आणि भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. हातात तिरंगा घेऊन, 'भारत माता की जय' आणि 'वंदे मातरम्' च्या घोषणा देत निघालेली ही पदयात्रा संपूर्ण शहरात देशभक्तीचे



वातावरण निर्माण करत होती. रस्त्यावरून जाणाऱ्या अनेक नागरिकांनी रॅलीवर पुष्पवृष्टी करून या अभियानाचे स्वागत केले. भाजपच्या या 'हर घर तिरंगा' अभियानाचे महत्त्व केवळ राजकीय नाही. अशा उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना बळावते. भास्कर दानवे आणि माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी दिलेल्या माहितीनुसार, हे अभियान प्रत्येक घरात पोहोचावे यासाठी तीन दिवस शहरात तिरंगा रॅलींचे आयोजन करण्यात आले आहे.

या रॅलीमुळे युवा पिढीला आपल्या देशाचा इतिहास आणि राष्ट्रध्वजाचे महत्त्व समजून घेण्यास मदत झाली. विविध सामाजिक स्तरातील लोक एकत्र येऊन एका ध्वजाखाली उभे राहिल्याने सामाजिक एकतेचा संदेशही दिला गेला. या उपक्रमाने जालन्यातील नागरिकांच्या मनात देशभक्तीचा ठसा उमटवला, ज्यामुळे येत्या स्वातंत्र्य दिनाचा उत्साह अधिक वाढणार आहे.

# कुशीवर्ताबाई मुके यांचे निधन

**परतूर । प्रतिनिधी -** येथील जेष्ठ नागरिक कुशीवर्ताबाई देविदासराव मुके यांचे बुधवार (दि.१३) रोजी वृद्धापकाळाने सकाळी निधन झाले. त्या ८२ वर्षांच्या होत्या.



त्यांच्या पार्थिवावर डहाळेगाव ता. घनसावंगी या त्यांच्या मुळगावी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी समाजातील सर्व स्तरातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात ३ मुले, १ मुलगी, सुना नातवंडे असा परिवार आहे.

त्या रमेश चांदर यांच्या बहीण व परतूर येथील सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब मुके त्यांच्या आई होत.

# बानेश्वर विद्यालयात रॅलीने देशभक्तीचा जागर

**जालना । प्रतिनिधी -** भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून मंगळवार ( दि १२) रोजी बानेश्वर विद्यालय, बाणेगाव येथे 'हर घर तिरंगा' रॅलीचे उत्साहात आयोजन करण्यात आले. या रॅलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी संपूर्ण बाणेगावात देशभक्तीचा जागर केला. या रॅलीची सुरुवात विद्यालयाच्या प्रांगणातून झाली. हातात तिरंगा घेऊन विद्यार्थी मोठ्या संख्येने यात सहभागी झाले होते. 'वंदे मातरम', 'जय हिंद', 'भारत माता की जय' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांनी गावातील लोकांना प्रत्येक घरावर तिरंगा ध्वज फडकावण्याचे आवाहन केले आणि या मोहिमेचे महत्त्व पटवून दिले. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. मंडलिक, तसेच शिक्षक चव्हाण जी.एस., श्री. राऊत, श्री. वाबळे, श्री. मोहिते, श्री. वडतकर, श्री. गायके, श्री. काकडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या सर्वांनी विद्यार्थ्यांच्या या उत्साही सहभागाचे कौतुक केले. या रॅलीमुळे गावातील लोकांमध्येही राष्ट्रध्वजाबद्दल आणि स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाबद्दल जागरूकता निर्माण झाली.

## जालना येथे 'ऑर्गन रिट्रीव्हल सेंटर' चे उदघाटन

# आमदार लोणीकरांकडून अवयवदानाचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** जागतिक अवयवदान दिनाचे औचित्य साधून जालना शहरात 'ऑर्गन रिट्रीव्हल सेंटर' चे उद्घाटन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बोलताना आमदार लोणीकर यांनी अवयवदानाचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले की, अवयवदान हे एक पुण्यकर्म असून, यामुळे गरजू रुग्णांना नवजीवन मिळते. अवयवदानामुळे वैद्यकीय सेवा सर्वांपर्यंत पोहोचते आणि सामाजिक समानता वाढीस लागते, असे त्यांनी स्पष्ट केले.




आमदार लोणीकर यांनी आपल्या भाषणात अनेक धर्म आणि संस्कृतींमध्ये अवयवदानाला 'पुण्यकर्म' मानले जाते असे सांगितले. समाजात अवयवदानाबद्दल असलेले गैरसमज आणि भीती दूर करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. प्रत्येक व्यक्तीने अवयवदान करून किमान आठ लोकांचे प्राण वाचवता येतात, ही भावना मनात बाळगावी, असे आवाहन त्यांनी केले. त्यांनी नागरिकांना आपल्या कुटुंबाशी चर्चा करून अवयवदानाचे फॉर्म भरण्याचे आवाहन केले, जेणेकरून गरजूंचे प्राण वाचवता येतील.

माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली २०१४ मध्ये मंत्रिमंडळाने अवयव प्रत्यारोपण आणि जनजागृतीसाठी विशेष योजना तयार केली होती, याची आठवण आमदार लोणीकर यांनी करून दिली. या योजनेमुळे अवयवदानाची प्रक्रिया सुलभ झाली असून, लोकांमध्ये जागरूकता वाढण्यास मदत झाली, असे ते म्हणाले.

यावेळी बोलताना आमदार लोणीकर यांनी संजीवनी हॉस्पिटलचे संचालक डॉ. बळीराम बागल यांच्या कार्याची प्रशंसा केली. कोविड-१९ महामारीच्या काळात आणि त्यानंतरही संजीवनी हॉस्पिटलने हजारो रुग्णांना जीवनदान दिले. गोरगरिबांना मदत करणारे आणि रुग्णसेवेसाठी सदैव तत्पर असलेले डॉक्टर म्हणून डॉ. बागल यांची ओळख संपूर्ण जिल्ह्यात असल्याचे लोणीकर यांनी सांगितले.

या उद्घाटन सोहळ्याला अनेक मान्यवर उपस्थित होते. यात माजी आमदार राजेश टोपे, कैलास गोरंट्याल, अरविंद चव्हाण, रामेश्वर भांदर्गे, उद्योजक सुनील रायठा, रमेश भाई पटेल, साईनाथ पवार, तसेच संजीवनी हॉस्पिटलचे अनेक डॉक्टर आणि इतर प्रतिष्ठित व्यक्तींचा समावेश होता. या सर्वांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# नवभारत कनिष्ठ महाविद्यालय व जे बी के विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे कॅरम स्पर्धेत यश

**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** तालुका क्रीडा स्पर्धा जाफराबाद क्रीडा व युवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे १ जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद जालना, यांच्या अंतर्गत तालुका क्रीडा अधिकारी जाफ्राबाद यांच्याद्वारे आयोजित दि.१३/८/२०२५. तालुकास्तरीय शालेय कॅरम क्रीडा स्पर्धेत श्रीमती जे बी के विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालय टेंभुर्णीतील सर्व वयोगटातून सर्वात जास्त.१० विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावर निवड झाली.

यामध्ये वयोगट १४ अनिकेत रणजीत जाधव,आर्य सुनील वाघ तर मुलीमध्ये अनुष्का आकाश कामे, निकिता ज्ञानेश्वर कल्याणकर, संध्या शिवाजी खांडेभराड. १७ वर्षे वयोगटात , प्रथमेश संतोष आवटी, युवराज सुरेशअण्णा सोळुंके तर मुलीमध्ये श्रद्धा अमोल कासारे, गौरी मुकुंद आवटी, वैष्णवी सुरेश साळुंके या खेळाडूंची निवड जिल्ह्या स्तरावर झाली आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष संजय काबरा, संस्थेचे उपाध्यक्ष शेख जमीर, सचिव सत्यनारायण सोनी, कोषाध्यक्ष सुभाष राठी, ज्येष्ठ संचालक रामनारायण काबरा, माजी अध्यक्ष तथा संचालक सुरेश शेठ काबरा, माजी सचिव तथा संचालक प्रेमसुख काबरा , माजी सचिव तथा संचालक प्रल्हाद टेंभुर्णीकर, संचालक राजीव काबरा, संचालक दिपक काबरा, संचालक विश्वनाथ सांगोळे, संचालक मधुकर निकम, संचालक तथा प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, संचालक प्रदीप मुळे, संचालक प्रदीप काबरा, तसेच सर्व विश्वस्त यांनी व प्राचार्य सखाराम बोरकर, प्राध्यापक सुनील बनसोडे, प्राध्यापक रामदास भांगे, प्राध्यापक केजी जाधव, प्राध्यापक



गजानन धोटे, प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव, रमेश इंगळे, कैलास भुतेकर, राजेश शेवाळे, राजेंद्र जगताप, रवींद्र मोरे, भीवसन ससाने, दिनकर उखर्डे, दत्ता उखर्डे, समाधान कांबळे, वासुदेव क्षीरसागर, आवटी मॅडम, पाटील मॅडम, शेख मॅडम, कळंबे मॅडम, भिलावेकर मॅडम, लंबे मॅडम, राजू डोमळे, नागोराव देशमुख डीजे तांबेकर, दीपक देशमुख आदींनी अभिनंदन केले आहे.

# जालना गणेश फेस्टीवलमध्ये आज सभा मंडप पूजन

**जालना । प्रतिनिधी -** स्व. कल्याणराव घोगरे स्टेडियममध्ये आज म्हणजे गुरुवार, दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११.३० मान्यवरांच्या हस्ते सभा मंडपाचे भूमीपूजन होणार ऊसन यावेळी सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जालना गणेश फेस्टिवलचे अध्यक्ष अशोकराव आगलावे यांच्यासह जालना गणेश फेस्टिवलचे संस्थापक अध्यक्ष संजय लाखे पाटील यांनी केले आहे. जालना गणेश फेस्टीवलचे हे २५ वे वर्षे म्हणजे रौप्यमहोत्सवी वर्षे असुन या निमित्त बहारदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या पंचवीस वर्षात या फेस्टीवलचे नांव संपूर्ण महाराष्ट्रात झाले असून विविध आंतरराष्ट्रीय स्तरावरील कलाकर देखील येथे येऊन गेले आहे. त्याच धर्तीवर यंदाही कार्यक्रमाची रेलचेल राहणार आहे.

यावेळी सर्वांसह गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन डॉ. संजय राख, शरद देशमुख, दिनेश फलके, राजेंद्र राख, सुभाष कोळकर, किरण गरड, चंद्रशेखर वाळिंबे, राजेंद्र गोरे, सुरेशराव मुळे, अशोकराव उबाळे, अजिंक्य घोगरे, प्रसाद वाढेकर, ॲड. सुनील किनगावकर, शंकर लुंगे, राहुल अग्रवाल, श्रेया विलास नाईक, प्रा.राजेंद्र भोसले आदींनी केले आहे.




# आई-बाप हेच खरे दैवत - प्रा. हंकारे

**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा भोकरदन नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त जाफराबाद तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेत एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रा. वसंत हंकारे यांनी 'आई-बापाची आठवण जन्मभर ठेवा' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रा. हंकारे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आई-वडील हेच मुला-मुलींसाठी जगातील सर्वात मोठे दैवत आहेत. अनेकदा आर्थिक परिस्थिती हलाखीची असतानाही, वडील स्वतःच्या गरजा बाजूला ठेवून मुलांचे भविष्य घडवण्यासाठी अतोनात कष्ट करतात. त्याचप्रमाणे, आई आपल्या मुलांच्या सुंदर स्वप्नांना पंख लावण्यासाठी नेहमीच तत्पर असते. म्हणूनच, मुलांनी त्यांच्या या कष्टांची आणि त्यागाची जाणीव ठेवून नेहमी त्यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे.

प्रा. हंकारे यांनी तरुणांना एक मोलाचा सल्ला दिला. ते म्हणाले की, मुलांनी असे कोणतेही कृत्य करू नये, ज्यामुळे आई-वडिलांची मान समाजात खाली जाईल. आपल्या वागण्याने त्यांना अभिमान वाटेल, असेच काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. आई-वडिलांचा आदर करणे आणि त्यांच्या कष्टांना समजून घेणे ही आजच्या पिढीची सर्वात मोठी जबाबदारी आहे, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला अनेक राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यात खासदार डॉ. कल्याण काळे यांचे बंधू भाऊसाहेब काळे, काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष रामधन कळंबे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख कुंडलिक मुठे, काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे, सेवानिवृत्त शिक्षक एल.बी. शिंदे, तालुकाध्यक्ष अजय बनकर, राष्ट्रवादी शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष तथा सरपंच एकनाथ शेवत्रे, डॉ. अशोक परिहार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रमोद फदाट, पंकज लोखंडे, राजू आम्ले, गणेश आढे, शहरप्रमुख मुन्ना ठाकूर, समीर शहा, सुलतान कुरेशी यांच्यासह काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना या पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.